# शिवाजी विद्यापीठात सांडपाण्याचा होणार पुनर्वापर

## मुलांच्या वसतिगृहातील सांडपाणी उद्यानासाठी वापरण्यात येणार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाने पाणी साठवणूक करण्यामध्ये आघाडी घेतली आहे. मुलींच्या वसतिगृहानंतर आता बॉईज हॉस्टेलच्या सांडपाण्याचाही पुनर्वापर केला जाणार आहे. या सांडपाण्यावर त्या परिसरातील बागा फुलणार आहेत.

गेल्या काही वर्षांत शिवाजी विद्यापीठाने पाणी साठवणुकीसाठी विविध उपाय अवलंबले आहेत. त्यासाठी पाणी वाहून नेणाऱ्या चरींची नियमित स्वच्छता करणे, त्यांचे खोलीकरण करणे आदी काम हाती घेण्यात आली, तर त्याचबरोबर विहिरींचे पुनरुज्जीवन आणि नवीन शेततळ्यांची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे विद्यापीठाच्या भूजल पातळीत चांगलीच वाढ झालेली आहे. पावसाचे पाणी साठवूण जमिनीमध्ये मुरविण्याबरोबरच विद्यापीठाने पाण्याच्या पुनर्वापराकडे विशेष लक्ष दिले आहे.

यामध्ये विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहामधील सांडपाण्याचा पुनर्वापर केला जातो. पूर्वीपासून मुलींच्या वसतिगृहामधील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते. हे प्रक्रिया केलेले पाणी परिसरातील बागांसाठी वापरण्यात येते. त्यामुळे या बागा चांगल्या फुलल्या आहेत.

सध्या शिवाजी विद्यापीठातील मुलांच्या वसतिगृहातील सांडपाण्याचा पुनर्वापर करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतलेला आहे. त्यासाठी होस्टेलच्या पूर्व दिशेला कामास सुरुवात करण्यात आली आहे. जवळपास २० लाख रुपयांचा खर्च या सांडपाणी पुनर्वापर प्रकल्पासाठी अपेक्षित आहे. या सांडपाण्याच्या पुनर्वापरातून या परिसरातील बागा फुलवल्या जाणार आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मुलांच्या वसतिगृहातील सांडपाणी पुनर्वापर प्रकल्पाचे सुरू असलेले काम.

# ‘सायबर हल्ल्याबाबत सतर्कता आवश्यक’

कोल्हापूर : ‘सायबर हल्ल्याचा धोका लक्षात घेऊन कर्मचाऱ्यांनी या संबंधी माहिती घेऊन सतर्कता दाखवण्याची आवश्यकता आहे,’ असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या उद्योजकता व कौशल्य विकास केंद्र आणि जिल्हा नागरी बँक असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने सायबर सेक्युरिटी विषयावर आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. नागरी बँक असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ॲड. प्रशांत माळी यांनी सायबर कायद्याविषयी व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे आयोजन उद्योजकता व कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. अण्णासाहेब गुरव, अनिल नागराळे, महेश चव्हाण यांनी केले.

# जातीजातींतील राष्ट्रवाद स्फोटकांपेक्षा घातक

## प्रा. डॉ. सूरज येंगडे; शिवाजी विद्यापीठात माणगाव परिषद शताब्दी वर्ष व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : 'सध्याचा राष्ट्रवाद हा जातीजातींत विभागला आहे, तो स्फोटकांपेक्षा घातक आहे. अशा राष्ट्रवादामुळे बुद्धिप्रामाण्यवाद आंधळा होतो. म्हणूनच खऱ्या राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी जाती, पोटजाती हा भेद नष्ट व्हावा लागेल,' असे मत अमेरिकेतील हार्वर्ड केनडी स्कूल येथील संशोधक डॉ. सूरज येंगडे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे माणगाव परिषद शताब्दी वर्ष व्याख्यानमालेत ते बोलत होते.

'राष्ट्रवाद आणि आंबेडकर' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. येंगडे म्हणाले, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे भारतीय समाज हा हजारो जातीजातींत विभागला आहे. त्याअंतर्गत आणखी पोटजाती आहेत. इथली प्रत्येक जात ही एक स्वतंत्र राष्ट्र आहे आणि प्रत्येक नागरिक हा ज्याच्या त्याच्या जातीशी-राष्ट्राशी प्रामाणिक आणि बांधील राहण्यासाठी प्रयत्नशील असतो. या प्रत्येक पोटजातीत जिचा तिचा राष्ट्रवाद आहे. ही बाब एखाद्या स्फोटकापेक्षा कमी नाही. म्हणून खऱ्या राष्ट्रवादाच्या प्रस्थापनेसाठी प्रथमतः हा जातीजातींमधील, पोटजातींमधील भेद संपूर्णतः नष्ट करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे आपला राष्ट्रवाद हा परस्पर द्वेषाबरोबरच क्रिकेट-राष्ट्रवाद आहे. यामुळे खेळामध्ये अभिप्रेत असलेल्या खिलाडूवृत्तीला हरताळ फासला जातो आणि अखिलाडू राष्ट्रवाद हा खरा राष्ट्रवाद पुढे आणला जातो. धनिक लोक राष्ट्रवादाची भूमिका व दिशा ठरवितात. तो देशाचा राष्ट्रवाद म्हणून पुढे केला जातो. कष्टकरी, मजूर, महिला, शोषित, वंचित यांचा राष्ट्रवाद हा आपला कधीच होत नाही. राष्ट्रवादाचा पुरस्कारच करावयाचा असेल तर तो आर्थिक राष्ट्रवादाचा केला पाहिजे.''

डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, ''भारतीय म्हणून आपली ओळख देताना आपण स्वतःच्या इतर ओळखी मात्र आपण सोडल्या नाहीत, ही मोठी चूक आहे. असे साऱ्या प्रकारचे भेद आपण सोडून दिले पाहिजेत. राष्ट्रवादापेक्षा मानवतावाद हा सर्वश्रेष्ठ आहे. मानवी मूल्याधिष्ठित, समतामूलक आणि अहिंसात्मक राष्ट्र म्हणून ओळख निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी संविधानिक मूल्ये अंमलात आणण्याची खरी गरज आहे.''

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले. तेजपाल मोहरेकर यांनी स्वागत केले, सचिन देठे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : 'डॉ. आंबेडकर व राष्ट्रवाद' विषयावर बोलताना प्रा. डॉ. सूरज येंगडे.**

19 JUL 2019
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रवादासाठी जातीभेद नष्ट करण्याची गरज

## अमेरिकेतील हॉवर्ड केनेडी स्कूलमधील संशोधक डॉ. सूरज येंगडे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटल्याप्रमाणे भारतीय समाज हा हजारो जातींमध्ये विभागला असून, त्याअंतर्गत आणखी पोटजाती आहेत. प्रत्येक जात स्वतंत्र राष्ट्र असल्याने प्रत्येक नागरिक हा ज्याच्या त्याच्या जातीय-राष्ट्राशी प्रामाणिक आणि बांधील राहण्यासाठी प्रयत्नशील असतो. प्रत्येक पोटजातीतील राष्ट्रवाद एखाद्या स्फोटकापेक्षा कमी नाही. म्हणून खऱ्या राष्ट्रवादाच्या प्रस्थापनेसाठी जातीजातींमधील भेद नष्ट करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील हॉवर्ड केनेडी स्कूल येथील संशोधक डॉ. सूरज येंगडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित माणगाव परिषद शताब्दी वर्ष व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प गुंफताना 'राष्ट्रवाद आणि आंबेडकरवाद' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रवाद आणि आंबेडकरवाद" या विषयावर बोलताना अमेरिकेतील हॉवर्ड केनेडी स्कूल येथील डॉ. सूरज येंगडे. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. श्रीकृष्ण महाजन.**

डॉ. येंगडे पुढे म्हणाले, अंबानी, अदानी, मल्ल्या आदी धनिक राष्ट्रवादाची भूमिका व दिशा ठरवितात. कष्टकरी, महिला, शोषित, वंचित यांचा राष्ट्रवाद कधीच होत नाही. पुर्वी संस्कृतीच्या नावाखाली झालेल्या चुकीच्या, समाजविघातक गोष्टींचे नव्याने पुनरुज्जीवन होत आहे. आर्थिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला पाहिजे. प्रगती, मुक्ती, महिला सबलीकरणाचा आग्रह धरणारा, मध्ययुगीन, पुरणमतवादी संकल्पनांतून बाहेर काढून समाजाला आधुनिकतेच्या दिशेने घेऊन जाणारा राष्ट्रवाद असावा. फुले-शाहू-आंबेडकरांच्या मार्गाने जाणारा राष्ट्रवाद हवा, अशी अपेक्षाही डॉ. येंगडे यांनी व्यक्त केली.

तेजपाल मोहरेकर यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. सचिन देठे यांनी आभार मानले. यावेळी शिक्षक, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत

# विदेशी भाषा अभ्यासक्रमासाठी उद्यापर्यंत मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षासाठी शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या रशियन, जर्मन, जपानी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरु झाली आहे. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज भरण्याची मुदत शनिवार (दि. २०)पर्यंत वाढविली आहे.

विदेशी भाषा अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता प्रत्येकी ५० आहे; यासाठी बारावी उत्तीर्ण किंवा समकक्ष अशी प्रवेश अर्हता आहे. रोज सायंकाळी एक तास याप्रमाणे वर्ग असतात. उद्योग, पर्यटन, हॉटेल, माहिती तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांत विदेशी भाषा अवगत असणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध असतात.

प्रवेशाबाबतच्या अधिक माहितीसाठी विदेशी भाषा विभाग येथे संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे

पुढारी

# विदेशी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश अंतिम मुदत उद्या

**कोल्हापूर: प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागात रशियन, जपानी व जर्मन भाषा अभ्यासक्रम प्रवेशासाठी २० जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्याच्या आधारे संधी कशा निर्माण होतील, याचा विचार करून सर्टिफिकेट कोर्स इन रशियन, जपानी व जर्मन या कोर्सेसची निर्मिती केलेली आहे. नजीकच्या भविष्यात फ्रेंच व पोर्तुगीज या भाषेचे वर्गही सुरू होणार आहेत. हे कोर्सेस सर्व वयोगटांसाठी खुले आहेत. बारावी उत्तीर्ण झालेली कोणीही व्यक्ती या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतो. विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक, गृहिणी असे अनेक जण या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात. विदेशी भाषेतील सर्टिफिकेट कोर्सचा कालावधी एक वर्षाचा आहे. अभ्यासवर्ग आठवड्यातून पाच दिवस नियमितपणे होतात. विद्यापीठाकडूनच दोन सेमिस्टरमध्ये परीक्षा घेतल्या जातात. प्रवेशासाठी विदेशी भाषा विभाग, भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ येथे संपर्क करावा, असे आवाहन समन्वयक मेधा पानसरे यांनी केले आहे.